# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### राष्ट्रीय सेवा योजना विभाग

पुढारी | पुणे, गुरुवार
१३ सप्टेंबर २०१८

## सहिष्णुतेशिवाय कोणतीही संस्कृती टिकणार नाही : डॉ. शिंदे

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

भारताची जगातील ओळख ही संपत्तीपेक्षा संस्कृतीने निर्माण झाली आहे. सहिष्णुतेशिवाय कोणतीही संस्कृती टिकणार नाही. प्रत्येकाने आपापल्या धर्मातील सर्वसमावेशकता व सहिष्णुता समजावून घेतली तरच स्वामी विवेकानंदांना अपेक्षित असलेल्या विश्वधर्माची कल्पना सत्यात उतरेल, असे मत उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी व्यक्त केले. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो धर्मपरिषदेतील भाषणाला झालेल्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिंदे बोलत होते. प्रा. दिलीप मुळूक, कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. निलेश बारणे आदी यावेळी उपस्थित होते. या वेळी त्यांनी अमेरिकेत स्वामी विवेकानंदांनी राजयोग, भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, रामायण, महाभारत, भारतीय स्त्रीजीवनावर दिलेल्या व्याख्यानांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय शिंदे.
(छाया : कोंडीभाऊ पाचारणे)

शिकागो येथील विश्वधर्म परिषदेला १२५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल स्वामी विवेकानंद यांचे चरित्र व विचार या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पूजा सानप, द्वितीय क्रमांक शिव कदम व तृतीय क्रमांक हरिप्रसाद खळदकर यांनी मिळवला. कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. प्रा.

जनप्रवास

शुक्रवार, दि. ०५ ऑक्टोबर २०१८

# संस्कृतीला सहिष्णुतेची गरज : डॉ. संजय शिंदे

**राजगुरुनगर । वार्ताहर**

भारताची जगातील ओळख ही संपत्तीपेक्षा संस्कृती असून सहिष्णुतेशिवाय कोणतीही संस्कृती टिकणार नाही. तेव्हा प्रत्येकाने आपापल्या धर्मातील सर्वसमावेशकता व सहिष्णुता समजावून घेतली तरच स्वामी विवेकानंदांना अपेक्षित असलेल्या विश्वधर्माची कल्पना सत्यात उतरेल असे मत उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी मांडले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो धर्मपरिषदेतील भाषणाला झालेल्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्रा.दिलीप मुळूक, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा.योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. निलेश वारणे उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे पुढे म्हणाले की, स्वामी विवेकानंदांनी विश्वधर्म सभेत अखंड मानव समाजाच्या कल्याण व विश्वशांतीसाठी विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. साऱ्या जगाला भारतीय संस्कृती व अध्यात्म तत्त्वज्ञानाच्या वैश्विकतेचा परिचय करून दिला. जगातल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर वैश्विक पातळीवर शोधण्याची गरज व्यक्त केली. जगाच्या संदर्भात सर्व धार्मिक कलहांचा अंत करणाऱ्या सार्वजनिक मानवता धर्माची आवश्यकता स्वामी विवेकानंदांनी मांडल्याचे ते म्हणाले. या वेळी त्यांनी अमेरिकेत स्वामी विवेकानंदांनी राजयोग, भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, रामायण, महाभारत, भारतीय स्त्रीजीवनावर दिलेल्या व्याख्यानांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख